**L. A. BILL No. XII OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GOODS AND SERVICES TAX ACT, 2017.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२.**

**महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.)**

२०१७ चा महा. ४३. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या खेरीज, हे कलम तात्काळ अंमलात येईल, आणि उर्वरित कलमे, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात येतील आणि या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या अशा कोणत्याही तरतुदींमधील कोणत्याही संदर्भाचा, ती तरतूद अंमलात येण्याचा संदर्भ असल्याप्रमाणे अन्वयार्थ लावण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ७ मधील, पोट-कलम (१) मधील, खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल आणि तो, १ जुलै २०१७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येईल :— २०१७ चा महा. ४३.

"(कक) नैसर्गिक व्यक्ती व्यतिरिक्त एखाद्या व्यक्तीने, रोख रकमेसाठी, विलंबित प्रदानासाठी किंवा अन्य मौल्यवान मोबदल्यासाठी तिच्या सदस्यांशी किंवा घटकांशी केलेला अथवा तिच्या सदस्यांनी किंवा घटकांनी अशा व्यक्तीशी केलेला व्यवहार किंवा संव्यवहार.

**स्पष्टीकरण.—**या खंडाच्या प्रयोजनांसाठी, याद्वारे, असे स्पष्ट करण्यात येते की, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात अथवा कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या किंवा प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, व्यक्ती आणि तिचे सदस्य किंवा घटक या दोन स्वतंत्र व्यक्ती असल्याचे मानण्यात येतील आणि परस्परांतील व्यवहार किंवा संव्यवहार याचा पुरवठा हा अशा एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे केला असल्याचे मानण्यात येईल ;".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मधील, पोट-कलम (२) मधील, खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(कक) खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या बीजकाचे किंवा नावेपत्राचे तपशील, पुरवठादाराकडून जावक पुरवठ्याच्या विवरणपत्रामध्ये सादर करण्यात आला नसेल आणि असे तपशील कलम ३७ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने अशा बीजकाच्या किंवा नावेपत्राच्या प्राप्तकर्त्याला कळविण्यात आला नसेल ;".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मधील, पोट-कलम (५) वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ चे कलम ४४ बदली दाखल करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४४ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

वार्षिक विवरण.

"**४४.** निविष्टी सेवा वितरक, कलम ५१ किंवा कलम ५२ अन्वये कर भरणारी व्यक्ती, नैमित्तिक करपात्र व्यक्ती आणि अनिवासी करपात्र व्यक्ती यांव्यतिरिक्त प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, वार्षिक विवरण विहित करण्यात येईल अशा वेळी व अशा नमुन्यात आणि अशा रीतीने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील ज्यात, प्रत्येक वित्तीय वर्षासाठी लेखापरीक्षा केलेल्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रासह, त्या वित्तीय वर्षासाठी सादर केलेल्या विवरणात घोषित केलेल्या मूल्याचा मेळ बसविणारे स्वयं-प्रमाणित पुनर्मेळ विवरणपत्र अंतर्भूत करता येईल :

परंतु, आयुक्तास, परिषदेच्या शिफारशीवरून, अधिसूचनेद्वारे, या कलमान्वये वार्षिक विवरण भरण्यापासून नोंदणीकृत व्यक्तींच्या कोणत्याही वर्गास सूट देता येईल :

परंतु आणखी असे की, या कलमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, ज्यांची लेखा पुस्तके भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये स्थानिक प्राधिकरणांच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी नियुक्त केलेला लेखा परीक्षक यांच्याद्वारे लेखापरीक्षा करण्यास अधीन आहेत, अशा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाला किंवा स्थानिक प्राधिकरणाला लागू असणार नाही. ”.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५० मधील, पोट-कलम (१) मधील, परंतुकाऐवजी पुढील परंतुक दाखल करण्यात येईल आणि ते, १ जुलै २०१७ पासून दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल :— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५० ची सुधारणा.

“ परंतु, एखाद्या कर कालावधीत केलेल्या आणि कलम ३९ च्या तरतुदींनुसार नियत दिनांकानंतर सादर केलेल्या उक्त कालावधीच्या विवरणात घोषित केलेल्या पुरवठ्यांच्या बाबतीत, प्रदेय असलेल्या करावरील व्याज हे, असे विवरण उक्त कालावधीच्या बाबतीतील कलम ७३ किंवा कलम ७४ अन्वये कोणत्याही कार्यवाहीच्या प्रारंभानंतर सादर केले असेल त्याखेरीज, इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवाहीमध्ये नावे खाते नोंदकरून जो भरला असेल त्या कराच्या भागावर प्रदेय असेल.”.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५४ मधील, पोट-कलम (८क) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल आणि ते, १ सप्टेंबर २०१९ पासून दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल :— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५४ ची सुधारणा.

“ (८क) जेव्हा केंद्र सरकारने राज्य कराचा परतावा संवितरित केला असेल तेव्हा, शासन अशा परताव्याच्या रकमे इतकी रक्कम केंद्र सरकारला हस्तांतरित करील. ”.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७४ मधील, स्पष्टीकरण १ मधील, खंड (दोन) मध्ये, “ कलमे १२२, १२५, १२९ व १३० ” या मजकुराऐवजी “ कलमे १२२ व १२५ ” हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ७४ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७५ मधील, पोट-कलम (१२) मध्ये, पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल :— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ७५ ची सुधारणा.

**“ स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ “ स्वयंनिर्धारित केलेला कर ” या शब्दप्रयोगात, कलम ३७ अन्वये दाखल केलेल्या जावक पुरवठ्याच्या तपशिलाप्रमाणे प्रदेय असलेल्या कराचा समावेश असेल, परंतु ज्याचा समावेश कलम ३९ अन्वये दाखल केलेल्या विवरणामध्ये केलेला नाही. ”.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८३ मधील, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ८३ ची सुधारणा.

“ (१) जेव्हा प्रकरण-बारा, प्रकरण-चौदा किंवा प्रकरण पंधरा यांखालील कोणतीही कार्यवाही सुरू केल्यानंतर, शासनाच्या महसुलाच्या हिताचे रक्षण करण्याच्या प्रयोजनासाठी, तसे करणे आवश्यक असल्याबाबत आयुक्ताचे मत झाले असेल त्या बाबतीत, त्यास लेखी आदेशाद्वारे, विहित करण्यात येईल अशा रीतीने करपात्र व्यक्तीच्या किंवा कलम १२२ च्या पोट-कलम (१क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या, बँक खात्यासह तिच्या मालकीच्या कोणत्याही मालमत्तेवर, तात्पुरती जप्ती आणता येईल. ”.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०७ मधील, पोट-कलम (६) मध्ये, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १०७ ची सुधारणा.

“ परंतु अपीलकर्त्याने शास्तीच्या पंचवीस टक्क्यांइतकी रक्कम प्रदान केल्याशिवाय कलम १२९ च्या पोट-कलम (३) खालील आदेशाविरुद्ध अपील दाखल करता येणार नाही. ”.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १२९ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२९ मधील,—

(एक) पोट-कलम (१) मधील, खंड (क) व (ख) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

" (क) जेव्हा वस्तुचा मालक अशी शास्ती प्रदान करण्यास पुढे येतो तेव्हा, अशा वस्तुवर प्रदेय असलेल्या कराच्या दोनशे टक्के इतक्या समतूल्य शास्तीचे प्रदान केल्यावर, आणि करमाफ वस्तुंच्या बाबतीत, वस्तुंच्या मूल्याच्या दोन टक्के इतकी समतूल्य रक्कम किंवा रुपये पंचवीस हजार, यापैकी जी कमी असेल, तितक्या रकमेचे प्रदान केल्यावर ;

(ख) जेव्हा वस्तुचा मालक अशी शास्ती प्रदान करण्यास पुढे येत नसेल तेव्हा, वस्तुच्या मूल्याच्या पन्नास टक्के किंवा अशा वस्तुवर प्रदेय असलेल्या कराच्या दोनशे टक्के, यापैकी जी अधिक असेल तितक्या समतूल्य रकमेचे प्रदान केल्यावर, आणि करमाफ वस्तुंच्या बाबतीत, वस्तुंच्या मूल्याच्या पाच टक्के किंवा रुपये पंचवीस हजार रुपये, यापैकी जे कमी असेल, तितक्या रकमेचे प्रदान केल्यावर ; " ;

(दोन) पोट-कलम (२) वगळण्यात येईल ;

(तीन) पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (३) वस्तू व वाहने अडकवून ठेवणारा किंवा जप्त करणारा समुचित अधिकारी, असे अडकवून ठेवल्यापासून व जप्त केल्यापासून सात दिवसांच्या आत शास्ती विनिर्दिष्ट करणारी नोटीस देईल आणि त्यानंतर पोट-कलम (१) च्या खंड (क) किंवा खंड (ख) अन्वये शास्तीचे प्रदान करण्यासाठी अशी नोटीस बजावल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत आदेश देईल ; " ;

(चार) पोट-कलम (४) मधील " कोणताही कर, त्यावरील व्याज, किंवा शास्ती याची " या मजकुराऐवजी " कोणत्याही शास्तीची " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(पाच) पोट-कलम (६) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (६) जेव्हा कोणत्याही वस्तूची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीने किंवा वस्तूच्या मालकाने पोट-कलम (३) अन्वये पारित केलेल्या आदेशाची प्रत मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत, पोट-कलम (१) अन्वये शास्तीची रक्कम प्रदान करण्यात कसूर केली असेल त्याबाबतीत, अशा प्रकारे अडकवून ठेवलेली किंवा जप्त केलेली वस्तू किंवा वाहन, पोट-कलम (३) अन्वये प्रदेय असेलेली शास्ती वसूल करण्यासाठी विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा कालावधीत, विक्री करण्यास किंवा अन्यथा विल्हेवाट लावण्यास पात्र असेल :

परंतु, पोट-कलम (३) खालील शास्ती किंवा एक लाख रुपये यांपैकी जी कमी असेल तितक्या रकमेचे वाहतूकदाराने प्रदान केल्यावर, वाहन सोडून देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जेव्हा अडकवून ठेवलेल्या किंवा जप्त केलेल्या वस्तू नाशवंत किंवा धोकादायक स्वरूपाच्या असतील किंवा कालांतराने त्यांचे मूल्य घटण्याचा संभव असेल तेव्हा अशा बाबतीत, उक्त पंधरा दिवसांचा कालावधी समुचित अधिकाऱ्यांमार्फत कमी करता येईल. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १३० ची सुधारणा.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३० मधील,—

(क) पोट-कलम (१) मध्ये " या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जर ", या मजकुराऐवजी " जेव्हा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मधील, दुसऱ्या परंतुकामधील, " कलम १२९ च्या पोट-कलम (१) अन्वये लादण्यायोग्य असलेल्या शास्तीच्या रकमेपेक्षा " या मजकुराऐवजी " अशा वस्तूंवर प्रदेय असलेल्या कराच्या शंभर टक्के इतक्या समतूल्य शास्तीपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (३) वगळण्यात येईल.

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५१ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल,— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ चे कलम १५१ बदली दाखल करणे.

" **१५१.** आयुक्ताला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याला, आदेशाद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत, अशा नमुन्यात, आणि अशा रीतीने या अधिनियमाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी, माहिती सादर करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला निदेश देता येतील. ". माहिती मागविण्याचा अधिकार.

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५२ मधील, — सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १५२ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मध्ये,–

(एक) " कोणत्याही व्यक्तिगत विवरणात किंवा त्याच्या भागात " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) " या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या " या मजकुराआधी " संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) वगळण्यात येईल.

**१६.** मुख्य अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची दोन मधील, परिच्छेद ७ वगळण्यात येईल आणि तो, १ जुलै २०१७ पासून वगळण्यात आला असल्याचे मानण्यात येईल. सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या अनुसूची दोनची सुधारणा.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२.]**

**[महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. अजित पवार,**
उप मुख्यमंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.